# कार्यक्रमांचे अनुक्रम

१) आंतरराष्ट्रीय योग दिवस

२) सॅनिटायजर व मास्क वाटप

३) वृक्षारोपण

४) भारतीय स्वातंत्र्यदिन

५) शिक्षक दिन

६) रासेयो सल्लागार समिती स्थापना

७) राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती

८) वाचन प्रेरणा दिवस

९) संविधान दिवस

१०) महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

१२) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती

१३) माझी वसुंधरा – शपथ ग्रहण कार्यक्रम

१४) सायकल रॅलीव्दारा पर्यावरण संदेश

१५) राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

१६) नेताजी सुभाषचंद्र जयंती

१७) प्रजासत्ताक दिन

१८) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

१९) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मृतिदिन

२०) रक्तदान शिबीर

२१) मराठी भाषा गौरव दिवस

२२) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन

२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

Scanned with CamScann

# माहे – जून २०२०

# आंतरराष्ट्रीय योग दिवस

रविवार, दि. २१ जून २०२०

दिनांक २१ जून २०२० रोज रविवारला सकाळी ७.०० वाजता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रिडा विभागाच्या संयुक्त विध्यमाने कोरोनाच्या उद्रेकामुळे सर्व शासकीय नियमांचे पालन करून आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी जागतिक योग दिनाची माहिती देऊन योगाचे महत्व विशद केले. आपल्या प्राचिन भारतीय परंपरेत योग, योगासने व योगसाधना यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. आज संपूर्ण जग कोरोनाच्या छायेखाली वावरत असतांन योगाला अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरूस्त ठेऊ शकतो. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. ही योगसंस्कृती संपूर्ण जगाने स्वीकारली असून २१ जून २०१४ पासून संपूर्ण जगात योगदिन साजरा होत आहे. मानवी शरीरातील अनेक असाध्य व्याधींवर योग रामबाण उपाय ठरले आहे. म्हणून केवळ एक दिवस योग न करता प्रत्येक दिवशी माणसाने योगासाठी थोडा वेळ जरूर द्यावा व आपले तन आणि मन सुदृढ करावे, अशी महत्वपूर्ण माहिती दिली.

प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यावेळी बोलताना म्हणाले की, सुदृढ शरीरात सुदृढ आत्मा वास करीत असतो. शरीर हे मानसाचे खरे धन आहे. शरीर सुदृढ ठेवण्यासाठी व्यायामाची नितांत गरज आहे. तन आणि मनाचा एकत्रित व्यायाम पाहिजे असल्यास त्याला योगाशिवाय पर्याय नाही प्रत्येकाने आपल्या जीवनात योगाचा अंगीकार करून आपले तन व मन निरोगी ठेवावे.

यानंतर सिंदेवाहीतील योग प्रशिक्षक महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी श्री. दिनेश गुलाब म्हाटे यांनी उपस्थितांना अनेक योगांचे प्रशिक्षण दिले. या योग प्रशिक्षण कार्यक्रमात प्रा. लिलाधर वेदरे, प्रा. डॉ. राजेश डहारे, श्रीमती तरूताई मून, शुभांगी मानकर व निवडक विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScann

# कोविड – १९ च्या बचावाकरिता सॅनिटायझर व मास्क वा

शुकवार, दि. २६ जून

'माझ्या करिता नाही, तुमच्या करिता' (NOT ME BUT YOU) या राष्ट्री
योजनेच्या ब्रिदवाक्याला ध्यानात घेऊन दिनांक २६ जून २०२० रोज शुक्रवारला स
११.०० वाजता रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या दिवशी
विद्यार्थ्यांना सॅनिटायझर व दत्तक गावातील लोकांकरिता मास्क वितरण कार्य
आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांच्या निर्देशाप्रमाणे
कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम व प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी कोवि
१९ चे सर्व शासकीय नियम पाळून रासेयोच्या निवडक ५ मुलांना (२ मुली व ३
महाविद्यालयात बोलवून मास्क वितरण संदर्भात माहिती दिली. प्रा. जनबंधू मेश्राम
रासेयो स्वयंसेवकांना सांगितले की, आपले रासेयो पथक नेहमीच समाज उपयोगी
करीत असते. यावर्षी संपूर्ण जग कोरोनाच्या विळख्यात सापडले आहे व अ
कोरोनावर खात्रीलायक औषधे उपलब्ध नाहीत. त्यामुळे सुरक्षेचे उपाय म्हणून सा
वारंवार हात धुणे, सॅनिटायझरचा वापर करणे व तोंड संपूर्ण नाक झाकले
अशाप्रकारे मास्क वापरणे अत्यंत आवश्यक आहे. आपण सर्वांनी आपली कौटुंबि
सामाजिक जबाबदारी म्हणून हा संदेश सर्वांना सांगा व त्यांना मास्क कसे वापरावे
धडे दया असे स्वयंसेवकांना सांगितले.

महाविद्यालयाचे का. प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी असे सुचविले की, आ
महाविद्यालयातील रासेयो पथकाने मौजा चिटकी हे गांव दत्तक घेतले आहे. त्या
आपण कोरोना बाबत जनजागृती करून मास्क वाटप करावे. मान. प्राचार्यांच्या सुचने
रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे व स
सहकारी प्रा. डॉ. रिजवान शेख हे निवडक ५ स्वयंसेकांसोबत चिटकी या गावात
तेथील गरीब महिला व पुरूषांना ५० मास्कचे वितरण केले. काही कार्या
कामाकरिता विद्यार्थी महाविद्यालयात येतात. त्यांच्या सुरक्षेकरिता सॅनिटायझरचा उ
महाविद्यालयात करण्यात आला.

Scanned with CamScanner

# माहे – ऑगस्ट २०२०

## वृक्षारोपण कार्यक्रम

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२०

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि पर्यावरण जागृती व निसर्ग मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक ५ ऑगस्ट २०२० रोज बुधवारला महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील रासेयोचे माजी विद्यार्थी यांनी वृक्षारोपण करण्याकरिता खड्डे खोदण्याचे काम केले.

'वृक्षावल्ली आम्हा सोयरे वनचरे' असे संतांनी म्हटल्याप्रमाणे झाड हा मानवाच्या उपयोगी पडणारा आहे. बेसुमार वृक्ष तोड केल्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. पावसाचे प्रमाण कमी होऊन परिणामी लोकांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. प्राणवायूची गरज झाडेच पुरी करू शकतात. म्हणून प्रत्येकाने एकतरी झाड लावून त्याचे संगोपण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन वृक्षारोपण केले. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, पर्यावरण जागृती व निसर्ग मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. राजेश डहारे यांनी प्रथम वृक्षारोपण करून कार्यक्रमाचा श्रीगणेशा केला. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक तथा शिक्षकेत्तर बंधुंनी वृक्षारोपण केले.

Scanned with CamScanner

# स्वातंत्र्यदिन कार्यक्रम

शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०

दिनांक १५ ऑगस्ट २०२० रोज शनिवारला महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्य कार्यक्रम घेण्यात आला. सकाळी ठिक ७.४५ वाजता विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष योगेंद्रजी जैस्वाल यांचे शुभ हस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी संस्थेचे सचिव अरविंदजी जैस्वाल, संस्था सदस्य मान. सुदामराव खोब्रागडे, संस्था संचालित सर्वो कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अतुल केकरे, सर्वोदय कन्या को महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ. संगीता यादव, महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. वि बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, महाविद्यालयातील प्राध्या तथा शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक व निवडक रासेयो स्वयंसे कोविड – १९ च्या सर्व शासकीय नियमांचे पालन करीत उपस्थित होते.

ध्वजारोहन पार पडल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष मान. योगेंद्रजी जैस्वाल यांनी संस्थे शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी तथा विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्य लढयाची माहिती दे मार्गदर्शन केले व सर्व उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्र संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी केले, तर महाविद्याल कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमानंतर संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यरत शिक्षक, प्राध्यापक, शिक्षके कर्मचारी यांना चहापाणी देण्यात आले. उपस्थित रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन क मिठाईचे वाटप करण्यात आले.

Scanned with CamScann

# माहे – सप्टेंबर २०२०

## शिक्षक दिन कार्यक्रम

शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२०

दिनांक ५ सप्टेंबर २०२० रोज शनिवारला महाविद्यालयात शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त करण्याच्या उद्देशाने शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. खरे तर ५ सप्टेंबर हा स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस. हा दिवस संपूर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक महान दार्शनिक व शिक्षक होते. त्यांना शिक्षणाप्रती अत्यंत प्रेम होते. अशा थोर व्यक्तिमत्वाचा जन्मदिवस महाविद्यालयात शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या आरंभी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. यावेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमाचे संचालन इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रिजवान शेख यांनी केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. जनबंधू मेश्राम यांनी शिक्षकांच्या कार्यावर व गुरूशिष्य परंपरेवर प्रकाश टाकला. 'प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शिक्षकाचे अनन्य साधारण महत्व असते. आपल्या देशात प्राचीन काळापासून गुरू – शिष्य परंपरा अस्तित्वात असून शिक्षक हे विद्यार्थ्यांना जगण्यासाठी योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करतात. विद्यार्थ्यांचे विचार, मन आणि व्यक्तिमत्व घडविण्यामागे शिक्षकांचाच मोठा वाटा असतो.' असे मौलिक विचार व्यक्त केले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनीसुध्दा आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. 'प्रत्येक वर्ष भारत मे ५ सितंबर ये दिन शिक्षक दिन के रूप मे मनाया जाता है। इसी दिन हम अपने अनुभवी शिक्षकों को धन्यवाद देते है जिन्होने हमारा भविष्य उज्ज्वल बनाने मे अपना पुरा सहयोग दिया है। मै उपस्थित सभी शिक्षकों को शिक्षक दिन की बधाई देते हुए ये अपेक्षा करता हूँ की वे विद्यार्थीओ के भविष्य निर्माण कार्य मे अपना अमूल्य योगदान देंगे।' असे म्हणून त्यांनी उपस्थित सर्व प्राध्यापक तथा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

Scanned with CamScanner

# माहे – सप्टेंबर २०२०

## रासेयो सल्लागार समितीची गठन

शनिवार, दि. १२ सप्टेंबर :

दिनांक १२ सप्टेंबर २०२० रोज शनिवारला सकाळी १०.३० वा महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांचे अध्यक्षतेखाली प्राचार्य सभा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथ कशाप्रकारे कार्यक्रम आयोजित करावे व त्यांना सल्ला दयावा याकरीता रासेयो सल समिती गठन करण्याकरीता विचार विनीमय करण्यात आला.

कोविड – १९ च्या जागतिक महामारिमुळे शासकिय नियमांचे पालन कर सभा घेण्यात आली. कोरानाच्या उद्रेकामुळे महाविद्यालया बाहेरील कुनालाही बोलवि आले नाही. त्यामुळे ही सभा महाविद्यालयीन प्राध्यापकातच पार पडली. या सभेत ठरले की, कोरोनाचा काळ असल्यामुळे महाविद्यालयातील मागील वर्षातीलच सल्ल समिती यावर्षी सुध्दा पूर्ववत ठेवावी. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र यांनी या विचाराला दुजोरा दिल्यामुळे मागील वर्षातीलच सल्लागार समिती क ठेवण्यात आली.

महाविद्यालय रासेयो सल्लागार समिती

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. विजेंद्र बत्रा | कार्यकारी प्राचार्य | अध्यक्ष |
| २) श्री. गणेश जगदाळे | तहसिलदार सिंदेवाही | सदस्य |
| ३) डॉ. सतिश चिंतावार | आरोग्य अधिकारी | –//– |
| ४) प्रा. डॉ. मेघराज देवासे | प्राध्यापक | –//– |
| ५) प्रा. डॉ. सिध्दार्थ मदारे | प्राध्यापक | –//– |
| ६) सौ. मोसमी आत्राम | दत्तक ग्राम सरपंच | –//– |
| ७) श्री. पवन कोल्हे | रासेयो स्वयंसेवक | –//– |

Scanned with CamScann

# राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

गुरूवार, दि. २४ सप्टेंबर २०२०

दिनांक २४ सप्टेंबर २०२० रोज गुरूवार ला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन कार्यक्रम कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.

महाविद्यालयीन युवकांचा देशाच्या रचनात्मक जडणघडणीत सहभाग असावा या करिता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून दिनांक २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षणमंत्री डॉ. व्हि. के. आर राव यांनी महाविद्यालयीन युवकांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू केल्याची घोषणा केली. त्या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरूवात केली. कोरोनाच्या प्रकोपामुळे कोरोना बाबतचे सर्व शासकीय नियम पाळून हा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी केले. महाविद्यालयीन युवकांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता राष्ट्रीय सेवा योजना मोलाची भूमिका बजावते, असे प्रास्ताविकातून सांगितले.

रासेयो स्थापना दिनानिमित्य माहिती देतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास विशद केला. ''शिक्षणातून सामुदायिक विकास आणि सामुदायिक विकासातून शिक्षण'' ही राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना असून ''माझ्यासाठी नव्हे तर तुमच्या साठी'' हे रासेयोचे ब्रिदवाक्य असल्याचे सांगितले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे चिन्ह, रासेयोचा बिल्ला व स्वयंसेवकाची कर्तव्ये व मिळणाऱ्या प्रोत्साहनपर गुणांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी सांगितले की, ''आपली आजची विस्कटलेली घडी तरूणाईच बरी करू शकते. फक्त त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. मार्गदर्शनाची कार्यशाळा राष्ट्रीय सेवा योजना ही आहे.''

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. रिजवान शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अमित उके यांनी केले.

Scanned with CamScann

# माहे – ऑक्टोंबर २०२०

## राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती

शुक्रवार, दि. २ ऑक्टोंबर

दिनांक २ ऑक्टोंबर म्हणजे जागतिक अहिंसा दिवस तसेच राष्ट्रपिता महात्मा आणि स्व. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा जन्मदिवस. महात्मा गांधीजींनी 'अहिंसा परमो धर्म' ही शिकवण दिली; तर लालबहादूर शास्त्रीजींनी भारताला जवान, जय किसान' चा नारा दिला. या दोन्ही महामानवांची २ ऑक्टोंबर ही जयंती निमित्य त्यांना अभिवादन करण्याकरिता महाविद्यालयात 'अभिवादन कार्यक्रम' आयो करण्यात आला.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी गांधीजी व शास्त्रीजं प्रतिमांसमोर दीप प्रज्वलन करून त्यांना अभिवादन केले. रासेयो कार्यक्रम अधिका जनबंधू मेश्राम व प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनीही यावेळी गांधीजींच्या व शास्त्रीजं प्रतिमेसमोर अगरबत्ती लावून व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्र महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर डोंगरे, श्री. अमित उके, डॉ. मेघराज श्री. लिलाधर बेदरे, डॉ. दामोधर राऊत, श्री. तुमेश्वर बिसेन, डॉ. सिध्दार्थ मदो माधव वरभे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. भैय्या नागोसे, मनोहर मुंगले, मधुकर जल मोहन भेंडारे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या कार्यक्रमानिमित्य मह महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर थोडक्यात मनोगत व्यक्त

याच दिवशी विद्यार्थ्यांकरिता 'फिट इंडिया' या कार्यक्रमाचे आयोजन केले यामध्ये महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

Scanned with CamScanner

# वाचन प्रेरणा दिवस

गुरूवार, दि. १५ ऑक्टोंबर २०२०

दिनांक १५ ऑक्टोंबर २०२० रोजी गुरूवारला महाविद्यालयात भारतरत्न डॉ. एपीजे. अब्दूल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. १५ ऑक्टोंबर हा थोर भारतीय वैज्ञानिक डॉ. एपीजे. अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस. 'मिसाईल मॅन' म्हणून जगात त्यांची प्रसिध्दी. भारताच्या अग्नी – १, अग्नी – २ आणि अग्नी – ३ या प्रक्षेपण अस्त्राची निर्मिती केली. २००२ ते २००७ या काळात ते भारताचे अकरावे राष्ट्रपती होते.

डॉ. अब्दूल कलाम यांना विद्यार्थ्यांबद्दल विशेष प्रेम होते. आजचा विद्यार्थी हा उद्याच्या काळचा राष्ट्रनिर्माता आहे. तो ज्ञानी असावा, त्याने वचन करून ज्ञान संपादन करावे असे त्यांना वाटायचे. मुलांशी गप्पा मारण्याचा त्यांना छंद होता. डॉ. कलम हे युवकांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. अब्दूल कलामांनी विद्यार्थ्यांकरिता अनेक पुस्तके लिहिली. अदम्य जिद्द, इंडिया माय ड्रिम, उन्नयन, विंग्ज ऑफ फायर (अग्निपंख), टर्निंग पाईंटस्, दीपस्तंभ, परिवर्तनाचा जाहीरनामा, सेवन टेप्स टू इंडियन रेनेसांस इत्यादी. अशा या थोर भारतीय वैज्ञानिकाची जयंती महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवसाच्या रूपाने साजरी करण्यात आली.

कोविड – १९ च्या संपूर्ण शासकीय नियमांचे पालन करीत या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी ग्रंथपूजन करून डॉ. एपीजे. अब्दूल कलाम यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन करून हयांना अभिवादन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. रिजवान शेख यांनी केले तर 'वाचनाचे महत्व' या विषयावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. विजेंद्र बत्रा यांनी वक्त करून डॉ. कलामांच्या जीवनातील विशेष पैलूंचा परामर्श घेतला. आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी पार पाडले.

या कार्यक्रमात प्रा. डॉ. राजेश डहारे, प्रा. दामोधर राऊत, प्रा. डॉ. सिध्दार्थ मदारे, श्री. भैय्याजी नागोसे, श्री. मोहन भेंडाळे व प्रा. अमित उके यांची उपस्थिती होती.

Scanned with CamScann

# माहे – नोव्हेंबर २०२०

## संविधान दिवस

गुरूवार, दि. २६ नोव्हेंबर २०:

दिनांक २६ नोव्हेंबर २०२० रोजी गुरूवारला महाविद्यालयात संविधान दि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वात समता, न्याय व बंधूता यावर आधारित लिहिलेले भारताचे संविधान दि. २६ नोव्हे १९४९ ला तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या सुपूर्द केले. भारतीय संविधाना उद्देश पत्रिकेत लिहिल्याप्रमाणे भारताचे हे संविधान सर्वांना समान हक्क देणारे आहे. दिवसाचे स्मरण रहावे याकरिता महाविद्यालयात राष्ट्रीय योजना विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे निर्माते विश्वरत्न, प्रज्ञासूर्य डॉ. बाबास आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा अगरबत्ती व मेनबत्ती प्रज्वलित करून व त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिव केले.

त्यानंतर संविधान दिनानिमित्य भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे व करण्यात आले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी महाविद्यालयात प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे समोर संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन क उद्देश पत्रिकेची शपथ दिली. त्यांच्या पाठोपाठ उपस्थित सर्वांनी संविधानाच्या उद् पत्रिकेची शपथ घेतली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. रिजवान शेख यांनी पाडले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिलीप सोनवाणे, प्रा. डॉ. मेघ देवासे, प्रा. डॉ. सिध्दार्थ मदारे, प्रा. डॉ. माधव वरभे, प्रा. तुमेश्वर बिसेन, प्रा. लिल वेंदरे व श्री. भैय्याजी नागोसे, श्री. मनोहर गुंगले, शुभम जयस्वाल, निलेश जयस्वाल, श्रीमती तरूताई मून इ. कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScann

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीबा फुले स्मृतिदिन

शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२०

दिनांक २८ नोव्हेंबर २०२० रोजी शनिवारला सकाळी १०.०० वाजता क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्य महाविद्यालयात 'अभिवादन क्रांतिसूर्याला' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

'विद्येविना मती गेली' असे सांगत महाराष्ट्रात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य ज्योतीबांनी केले. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून फुल्यांनी पुरोगामी विचारांची मांडणी केली. आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी खर्ची घातले. त्या थोर महात्म्याचा २८ नोव्हेंबर हा स्मृतिदिवस. त्यांच्या कार्याप्रती उतराई होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम व प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी महात्मा ज्योतीबा फुल्यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन व माल्यार्पण करून त्यांना आपलपी आदरांजली अर्पण केली. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी पुष्प अर्पण करून त्यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन केले. कोरोना संक्रमणाचा काळ असल्यामुळे मास्क वापरून फक्त दहा बारा निवडक विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते.

प्रा. जनबंधू मेश्राम यांनी थोडक्यात महात्मा फुले यांच्या क्रांतिकार्याचा परिचय उपस्थितांना करून दिला. यावेळी महाविद्यालयातील प्रा. तुमेश्वर बिसेन, प्रा. डॉ. मेघराज देवासे, प्रा. डॉ. चंद्रशेखर डोंगरे, प्रा. लिलाधर बेदरे, प्रा. दिलीप सोनवाणे, प्रा. डॉ. सिध्दार्थ मटारे, प्रा. अमित उके, प्रा. डॉ. रिजवान शेख इ. प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# माहे – डिसेंबर २०२०

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

रविवार, दि. ६ डिसेंबर २०

दिनांक ६ डिसेंबर २०२० रोज रविवारला सकाळी ०८.३० वाजता महाविद्याल प्रज्ञासूर्य, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचा कार आयोजित करण्यात आला. १४ ऑक्टोंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडक नागपूर येथे स्वत: बौध्द धर्माचा स्वीकार करून लाखो दलित बांधवांना बौध्द धर्माची दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'बोधीसत्व' असेही म्हटले जाते. म्हणूनच त स्मृतिदिनाला महापरिनिर्वाण दिन असे म्हटले जाते.

६ डिसेंबर १९५६ या दिवशी दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे झाले. लाखो दीन दलितांचा कैवारी, शोषित पीडितांचा दीपस्तंभ या दिवशी का विझला. त्या दिवसाचे स्मरण म्हणून व थोर भारतीय महामानवाला, देशाच्या घटनाक आपली भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे अयोजन क आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. उ मेश्राम, प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे व काही शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे उपस्थिती कार्यक्रम पार पडला. कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा व उपस्थित प्राध्यापकांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर अगरबत्ती, मेनबत्ती प्रज्वलीत करून त्यांना अभिवादन केले. उपस्थित सर्वांनी पुष्प अर्पण करून महामानव डॉ. बाबा आंबेडकरांना आपली भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

Scanned with CamScann

# माहे – जानेवारी २०२१

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती

रविवार, दि. ३ जानेवारी २०२१

थोर समाजसेविका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेता, पहिल्या भारतीय शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस. या थोर समाजसेविकेला विनम्र अभिवादन करण्याकरिता महाविद्यालयात दिनांक ३ जानेवारी २०२१ राजी रविवारला सकाळी १.०० वाजता सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम तथा प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, रासेयो सहकारी प्रा. डॉ. रिजवान शेख यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन करून त्यांना अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. भैय्या नागोसे, मनोहर मुंगले व श्रीमती तरूताई मून उपस्थित होते.

कोरोना हया जागतिक महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या अनउपस्थितीत कोरोना बाबतचे सर्व शासकीय निमांचे पालन करून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

Scanned with CamScann

## 'माझी वसुंधरा' शपथ ग्रहण कार्यक्रम

शनिवार, दि. ९ जानेवारी २०

पर्यावरण रक्षण ही काळाची गरज आहे हे लक्षात घेऊन वसुंधरेचे सं करण्यासाठी ९ जानेवारी २०२१ रोज शनिवारला सकाळी ११.०० वा महाविद्यालयाच्या प्रांगणात 'माझी वसुंधरा' अभियानाअंतर्गत शपथ ग्रहण कार्यक्र आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांच्या सुचने महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रिजवान शेख यांनी व संरक्षणाबाबतची सर्व उपस्थितांना शपथ दिली. सर्व उपस्थित प्राध्यापक, शिक्ष कर्मचारी व विद्यार्थ्यांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी व आकाश या निसर्गाच्या पंचतत निगडीत जीवन शैलीचा स्वीकार करून शाश्वत व निसर्गपूर्वक जीवनप अंगिकारण्याची शपथ घेतली.

या शपथ ग्रहण कार्यक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधून मेश्राम डॉ. लेमदेव नागलवाडे, प्रा. तुमेश्वर बिसेन, प्रा. डॉ. दिलीप सोनवाणे, प्रा. डॉ. म देवासे, प्रा. लिलाधर बेदरे, महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. मधुकर जल्ल मनोहर मुंगले, भैय्याजी नागोसे, श्रीमती तरूताई मून, शुभांगी मानकर व वि विद्यार्थिनी उपस्थित होते.

## सायकल रॅलीव्दारा पर्यावरण रक्षण संदेश

रविवार, दि. १० जानेवारी

नगर पंचायत सिंदेवाही व्दारा आयोजित माझी वसुंधरा अभियान २०२१ अ आयोजित केलेल्या कार्यक्रमात सर्वोदय महाविद्यालय सिंदेवाहीच्या रासेयो स्वयंसे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम व डॉ. लेमदेव नागलवाडे मार्गदर्शनाखाली उत्स्फुर्त सहभाग घेतला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंदेवाही नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ. आ गंडाटे, प्रमुख अतिथी नगर उपाध्यक्ष श्री. स्वप्नील कावळे, मुख्यकार्यपालन अधिका सुप्रिया गटोड, श्री. नरेंद्र भैसारे, सुरेशभाऊ पेंदाम, नंदाताई बोरकर, भुपेश लाखे

Scanned with CamScann

युनुस शेख, डॉ. रिजवान शेख, गुरूदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष श्री. मागुळकर साहेब, श्री. माधव आदे, श्री. विनय खोब्रागडे, कावळे सर, मेश्राम सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामस्वच्छतेवर आधारीत भजनाने करण्यात आली. प्रास्तविक पंकज आसेकर अभियंता नगर पंचायत सिंदेवाही यांनी केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधून मेश्राम यांनी स्वच्छ ग्राम सर्वेक्षण अभियान आणि वसुंधरा अभियान यावर उपयुक्त असे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. श्री. स्वप्नील कावळे व श्री. माधव आदे यांनी सुध्दा उपयुक्त असे मार्गदर्शन केले. याच कार्यक्रमात गुरूदेव सेवा मंडळ सिंदेवाहीव्दारे मुख्यकार्यपालन अधिकारी डॉ. सुप्रिया राठोड यांचा ग्रामगिता ग्रंथदेवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. युनुस शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. सुधाकरजी निकुरे यांनी पार पाडले.

माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत जनजागृती करण्यासाठी सिंदेवाही शहरातील गांधी चौकातून सायकल रॅली काढण्यात आली. यामध्ये सर्वोदय महाविद्यालय येथील रासेयोच्या विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभाग घेतला. या सोबतच नगर पंचायतचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सुध्दा या रॅलीत स्वत:च्या सायकलसह सहभाग घेतला. ही रॅली नगर पंचायत पासून सुरू होवून शास्त्री चौक – आझाद चौक – आंबेडकर चौक – सिध्दार्थ चौक – पोलीस स्टेशन ते मुख्य रोडने इंदिरानगर येथे जावून तेथेच रॅलीची सांगता करण्यात आली.

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

मंगळवार, दि. १२ जानेवारी २०२१

दिनांक १२ जानेवारी २०२१ रोज मंगळवारला सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयात कोविड – १९ चे सर्व नियम पाळून स्वराज्य जननी राजमाता जिजाबाई व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंती प्रित्यर्थ अभिवादन कार्यक्रमाच आयोजन करण्यात आले.

ज्या वीरमातेने छत्रपती शिवरायांना घडविले त्या थोर मातेला व भारतीय संस्कृतीचा गौरव परदेशातही पोचविणाऱ्या स्वामी विवेकानंदाला अभिवादन करण्याकरिता या कार्यक्रमात विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, मान. श्री. योगेंद्रजी जैस्वाल, संस्थेचे सचिव-
प्रा. अविर जैस्वाल, महाविद्यालय विकास समितीचे पदाधिकारी
डॉ. सतिश चिलमवार, श्री. शितल मसगडवार, महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र

Scanned with CamScann

बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम व प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, स
सहकारी प्रा. डॉ. रिजवान शेख तथा महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्म
उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष मान. योगेंद्रजी जैस्वाल यांनी राजमाता जिजाबाई व स्व
विवेकानंद यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन व माल्यार्पण करून त्यांना अभिवादन के
उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनीही प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमात चर्चा करतांना डॉ. सतिश चिंतावार म्हणाले की, ''वीर माता जिज
श्री छत्रपती शिवाजी महाराजांची आई, जीचे संपूर्ण जीवनच त्याग आणि साहयाने प
होते. त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाना जिल्हयातील सिंदखेड राजा
आई गिरिजाबाई व पिता लखुजी जाधवांच्या पोटी झाला. आज त्या वीरमातेची ज
स्वामी विवेकानंदांचाही जन्म १२ जानेवारी १८६३ मध्ये कलकत्ता या ठिकाणी झ
त्यांच्या जयंती प्रसंगी मी माता जिजाऊ व स्वामी विवेकानंदांना विनम्र अभिवादन कर

रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी उपस्थित संस्थेचे सर्व पदाधिकारी
महाविद्यालय विकास समितीचे सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानले.

## नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

शनिवार, दि. २३ जानेवारी २

दिनांक २३ जानेवारी २०२१ रोज शनिवारला सकाळी १०.०० व
महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती 'पराक्रम दिवस' म्हणून स
करण्यात आली. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्रकुमार बत्रा यांनी
स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन व माल्
करून त्यांना अभिवादन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम, प्रा.
लेमदेव नागलवाडे यांनीही यावेळी नेताजींच्या प्रतिमेसमोर पुष्प अर्पण करून अभि
केले.

रासेयो व्दारा आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. डॉ. मेघराज ते
प्रा. डॉ. दिलीप सोनवाणे, प्रा. अमित उके, प्रा. डॉ. रिजवान शेख, मा. लिलाधर
श्री. मनोहर मुंगले, ग्रंथपाल श्री. दामोधर राऊत व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित
यावेळी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या क्रांतिका

Scanned with CamScanner

संघर्षमय जीवनकार्याबाबत दोन शब्द व्यक्त केले. ते म्हणाले, "२३ जनवरी १८९७ का दिन विश्व के इतिहासमे स्पर्षाक्षरों मे अंकित है। इस दिन स्वतंत्रता आंदोलन के महानायक सुभाषचंद्र बोस का जन्म कटक के प्रसिध्द वकील जानकीनाथ तथा प्रभावतीदेवी के यहां हुआ। १९३८ मे उन्हे कॉंग्रेस का राष्ट्रीय अध्यक्ष चुना गया। उस समय उन्होने कहा था – मैरी यह कामना है की महात्मा गांधी के नेतृत्व मे ही हमे स्वाधीनता की लडाई लडना है। सुभाषचंद्रजी ने आजादी के आंदोलन को एक नई राह देते हुए युवाओं को संगठित करने का प्रयास पुरी निष्ठा से शुरू कर दिया। १२ सितंबर १९४४ को रंगून मे शहीद यतींद्र दास के स्मृति दिवस पर नेताजी ने अत्यंत मार्मिक भाषण देते हुए कहा था – आप मुझे खून दो, मै आपको आजादी दुंगा। यही देश के नौजवानो मे प्राण फुंकनेवाला वाक्य था, जो भारत ही नही विश्व के इतिहास मे स्वर्णाक्षिररो में अंकित है। मै नेताजी के जन्मदिवस पर उनको शत शत नमन करता हूँ।"

या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी पार पाडले.

## भारतीय गणराज्य दिन कार्यक्रम

मंगळवार, दि. २६ जानेवारी २०२१

दिनांक २६ जानेवारी २०२१ रोज मंगळवारला सकाळी महाविद्यालयात भारतीय गणराज्य वर्धापन दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आपण २६ जानेवारी १९५० पासून लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य पध्दतीचा स्वीकार केला. भारतात लोकशाहीप्रधान शासन व्यवस्थेला सुरूवात झाली. राज्यकारभार व इतरही व्यवहार भारतीय राज्यघटनेनुसार सुरू झाले. त्या दिवसाचे स्मरण म्हणून महाविद्यालयात भारतीय गणराज्य दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्या प्रसारक संस्थेचा महोत्सव साजरा केला जातो परंतु यावर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे अगदी साधेपणाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सकाळी ८.०५ वाजता संस्थेचे अध्यक्ष मा. योगेंद्रजी जैस्वाल यांचे हस्ते ध्वजारोहण पार पडले. ध्वजारोहनानंतर अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना भारतीय गणराज्य दिनाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे सचिव मा. अरविंद जैस्वाल, सहसचिव मा. मनोहरजी नन्नेवार, संस्था सदस्य श्री.

Scanned with CamScanner

सुदामराव खोब्रागडे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री. नामदेव ठाकरे, सर्वो
शितल संगिडवार, सर्वोदय कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अतुल केकरे, महाविद्यालयातील प्राध्या
कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगिता यादव, महाविद्यालयातील प्राध्या
शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व प्रतिष्ठित गावकरी नागरीक उपस्थित होते.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात दि
१४ जानेवारी ते दिनांक २८ जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी भाषा सं
पंधरवडा साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र ब
मराठी विभाग प्रमुख प्रा. जनबंधू मेश्राम यांनी दिनांक १४ जानेवारी २०२१ ला म
भाषा संवर्धन पंधरवडयाचे उद्घाटन केले. आपल्या उद्घाटकीय मनोगतात त्यांनी
कोणतीही असो, तिचे जतन करणे आवश्यक आहे. भाषेचे संवर्धन करण्याकरित
जास्त प्रमाणात बोलली गेली पाहिजे. ज्या भाषेचा वापर थांबतो ती भाषा काला
नामशेष होत जाते, असे मौलिक मार्गदर्शन केले.

या पंधरवडयाच्या समारोपीय कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी वि
प्रमुख व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम हे होते. "भाषा ही केवळ
नसते, तर ती आपली संस्कृतीही असते. मराठी भाषा ही मराठी माणसांची अस्मिता
संस्कृती संपविण्यासाठी अगोदर त्यांची भाषा संपविली जाते. परकीय भा
आक्रमणामुळे व सध्याच्या युगाची गरज म्हणून आपण परकीय भाषा जरूर शिक
पाहिजेत, तर मराठी भाषेचे संवर्धन होईल. अन्यथा जगातील अनेक भाषा त्यांचा वाप
केल्यामुळे नष्ट झाल्या तशी आपली मायमराठीही नष्ट झाल्याशिवाय राहणार न
म्हणून प्रत्येक मराठी भाषिक माणसाने मराठीतच बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे"
महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारोपीय कार्यक्रमात मंचावर महाविद्याल
कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, प्रा. डॉ. मेघराज देवासे, प्रा. डॉ. माधव वरभे,
तुमेश्वर बिसेन, प्रा. लिलाधर बेदरे व प्रा. डॉ. राजेश डहारे उपस्थित होते.

या समारोपीय कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी केले
आभार प्रदर्शन प्रा. अमित उके यांनी पार पाडले.

Scanned with CamScanner

# राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मृतिदिन

शनिवार, दि. ३० जानेवारी २०२१

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकांच्या वतीने दिनांक ३० जानेवारी २०२१ राज शनिवारला सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा स्मृतिदिन संपन्न झाला. कोविड – १९ हया महामारीमुळे कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांचे समवेत महात्मा गांधीजींच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन व सूताची माला अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुध्दा महात्मा गांधीजींच्या प्रतिमेसमोर पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

यावेळी थोडक्यात का होईना पण रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम यांनी गांधींजींच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. ज्या महात्म्याने आयुष्यभर भारतीय जनतेच्या सुखदु:खाचा विचार केला, भारताला आपल्या अहिंसेच्या व सत्याग्रहाच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवून दिले, त्याच महामानवाची दिनांक ३० जानेवारी १९४८ ला एका माथेफिरूने हत्या केली. देशासाठी आपल्या सर्वस्वाचा होम करणाऱ्या या महात्म्याचा खून ही समस्त भारतीयांसाठी अत्यंत दुर्दैवी घटना होती. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनी गांधींजींनी संपूर्ण जगाला अहिंसा परमो धर्म ही शिकवण दिली व सत्याचा आग्रह धरण्याचा सल्ला दिला. ते खरोखर साबरमतीचे संत होते असे सांगितले. या कार्यक्रमाच्या वेळी प्रा. डॉ. सिध्दार्थ मदारे, प्रा. लिलाधर बेदरे, प्रा. डॉ. राजेश डहारे, प्रा. डॉ. रिजवान शेख, ग्रंथपाल श्री. दामोधर राऊत व श्री. भैय्याजी नागोसे, श्री. मनोहर मुंगले, श्री. नितीन सागुळले, श्रीमती तरूताई मून, शुभांगी मानकर इ. कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScann

# माहे – फेब्रुवारी २०२१

## रक्तदान शिबीर आयोजन

शुक्रवार, दि. १२ फेब्रुवारी २०

दिनांक १२ फेब्रुवारी २०२१ रोजी शुक्रवारला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा यो व क्रिडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आ या शिबीराचे उद्‌घाटन विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मान. योगेंद्रजी जैस्वाल यांचे हस्ते पार पडले. यावेळी वैद्यकिय अधिकारी ग्रामीण रूग्णालय सिंदेवाहीचे डॉ. कुल सामाजिक सेवा अधिक्षक जिल्हा शासकिय रूग्णालय चंद्रपूरचे डॉ. पंकज पवार, स सचिव मा. अरविंदजी जैस्वाल, संस्था सदस्य मा. सुदामराव खोब्रागडे, महाविद्याल कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा उपस्थित होते. शिबीरांचे उद्‌घाटन राष्ट्रपिता म गांधी व स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वल माल्यार्पण करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा केले. राष्ट्रहितासाठी रक्तदान करणे किती आवश्यक आहे हे प्रास्ताविकातून स्पष्ट सांगितले. प्रमुख अतिथी डॉ. पंकज पवार व डॉ. कुलसंगे यांनी शासकिय रूग्णा रक्ताची किती आवश्यकता असते याचे विवेचन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त क श्री. योगेंद्र जैस्वाल यांनी रक्तदानाचे महत्व सांगून 'रक्तदान हेच सर्वश्रेष्ट दान' आहे विचार व्यक्त केले.

रक्तदानाचा प्रारंभ महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ले नागलवाडे व प्रा. लिलाधर बेदरे यांनी रक्तदान करून केला. या शिबीरात एकुण रक्तदात्यांनी रक्तदान केले. हे शिबीर यशस्वी करण्याकरिता चंद्रपूर शास महाविद्यालयातील तंत्रज्ञ डॉ. गुणवंत जाधव, श्री. जय पचारे, श्री. लक्ष्मण ना सिंदेवाही ग्रामिण रूग्णालयातील श्रध्दा ताजने व डॉ. वनिता न्यालेवार यांनी मौ सहकार्य केले.

शिबीर यशस्वी करण्याकरीता राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. ज मेश्राम, सहकारी रिजवान शेख, प्रा. अमित उके, डॉ. मेघराज देवासे, नॅक समन्वयक राजेश डहारे, तसेच प्राध्यापक वर्ग तथा शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक प घेतले.

Scanned with CamScann

# मराठी भाषा गौरव दिन

शनिवार, दि. २७ फेब्रुवारी २०२१

दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोज शनिवारला सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मराठीतील सुप्रसिध्द साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. त्यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा गौरव दिवस म्हणून अवघ्या महाराष्ट्रात साजरा केला जातो. कोविड – १९ च्या संसर्गामुळे यावर्षी महाविद्यालयात निवडक विद्यार्थ्यांसह हा कार्यक्रम घेण्यात आला.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. जनबंधू मेश्राम हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी केल्यानंतर मार्गदर्शन कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रा. जनबंधू मेश्राम यांनी मराठी भाषा व मराठीतील थोर नाटककार, कवी, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त थोर साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांच्याविषयी माहिती दिली. कविवर्य कुसुमाग्रजांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे जाहीर करणारा मराठी अधिनियम १९६४ सर्व प्रथम ११ जानेवारी १९६५ ला प्रसिध्द करण्यात आला. परंतु अजूनही आपल्या मराठीला राजभाषेला दर्जा मात्र प्राप्त होऊ शकला नाही. 'इथे मऱ्हारिचिया नगरी। ब्रम्हविसेचा सुकाळू करी' असे मराठीचे वर्णन संत ज्ञानदेवांनी केले आहे.

कवी कुसुमाग्रज हे मराठीतील थोर कवी असून त्यांच्या विशाखा या काव्यसंग्रहाला अत्यंत सन्मानाचा समजला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार लाभला आहे अशी मौलिक माहिती दिली. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा यांनीसुध्दा यावेळी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून समयोचित मार्गदर्शन केले.

Scanned with CamScanner

# माहे – मार्च २०२१

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन

बुधवार, दि. १० मार्च २०;

दिनांक १० मार्च २०२१ रोज बुधवारला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा यो पथकाऱ्या वतीने स्त्रि शिक्षणाचा आद्यप्रणेत्या, विधेच्या जननी व समस्त भारतीय स्त्री उजेडाची वाट दाखविणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्य त्या पावन स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे सगळे जग संकटात सापडले. शा महाविद्यालये ओस पडली. परंतु विधेच्या या देवतेला कोविड – १९ च्या सर्व निय पालन करून महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन करण्य निमित्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी क्रांतिज्योजी सावित्रीबाई फुले या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन व माल्यार्पण करून त्यांच्या स्मृतीस आपली विनम्र आदरां अर्पण केली. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. तुमेश्वर बिसेन, प्रा. डॉ. सि मदारे, प्रा. डॉ. राजेश डहारे, प्रा. दिलीप सोनवाणे, प्रा. लिलाधर बेदरे, प्रा. डॉ. चंद्रशे डोंगरे, श्री. मधुकर जल्लावार, श्री. भैय्याजी नागोसेख श्रीमती तरूताई मून, ग्रंथपाल दामोधर राऊत, श्री. शुभम जैस्वाल, निलेश जैस्वाल इ. कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# माहे – एप्रिल २०२१

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम

बुधवार, दि. १४ एप्रिल २०

दिनांक १४ एप्रिल रोज बुधवारला सकाळी ९.०० वाजता विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३० व्या जयंती निमित्य महाविद्यालयातील राष्ट्रीय योजना विभागाच्या वतीने कोविड – १९ चे सर्व नियम पाळून अभिवादन कार्य घेण्यात आला.

Scanned with CamScann

१४ एप्रिल १८९१ साली महू या ठिकाणी भीमराव रामजी आंबेडकर उपाख्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मामुळे येथील बहुजन समाजातील वंचिताच्या कोटी कुळांचा उध्दार झाला. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण करण्याच्या उद्देशाने ज्ञानाच्या अथांग सागरास श्रध्दा सुमने अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, प्रा. डॉ. रिजवान शेख, मुख्य लिपीक श्री. मधुकर जल्लावार, भैय्याजी नागोसे, श्रीमती तरूताई मून व शुभांगी मानकर उपस्थित होते.

Scanned with CamScann

# □ कार्यवृत्त

# क्षणचित्रे

Scanned with CamScanner



मास्क वितरण करतानी महाविद्यालयाची रासेयो स्वयंसेविका.



दत्तक ग्राम चिटकी येथे मास्क वाटप करताना — रासेयो सहकारी प्रा. डॉ. रिजवान शेख. सोबत — उपसरपंच श्रीमती साधना बालाजी सिडाम.

Scanned with CamScann



महाविद्यालयातील रासेयो पथकातर्फे मास्क वाटप करताना – प्रा. डॉ. रिजवान शेख व ग्रा. प. नवेगांव लोनखैरीच्या उपसरपंच श्रीमती साधना सिडाम.



महाविद्यालयातील रासेयो पथकाव्दारा दत्तक गांव चिटकी येथील गरीब मजूर महिलांना मास्क वितरण केले तो क्षण.

Scanned with CamScann




महाविद्यालय परीसरात वृक्षारोपण करण्याकरिता खड्डे खोदतांना विद्यार्थी. उपस्थित – रासेयो कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील कर्मचारी.




महाविद्यालय परीसरात वृक्षारोपण करतांना महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा व रासेयो कार्यक्रम अधिकारी व डॉ. लेमदेव नागलवाडे. उपस्थित – महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी.

Scanned with CamScann




भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्य ध्वजारोहणानंतर मार्गदर्शन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा. योगेन्द्रजी जैस्वाल. कार्यक्रमाला उपस्थित संस्था पदाधिकारी, सर्वोदय ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, महाविद्यालयाचे प्राचार्य तथा प्राध्यापक वर्ग.



स्वातंत्र्यदिन मार्गदर्शनानंतर चहापाणी घेतांना व कर्मचाऱ्यांशी हितगुज करतांना – संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी.

Scanned with CamScann




राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस निमित्याने ऑनलाईन कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम, मंचावर उपस्थित महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा, प्रा. डॉ. रिजवान शेख व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे.




रासेयो स्थापना दिवस कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा. सोबत – उपस्थित प्राध्यापक.

Scanned with CamScanner



राष्ट्रपिता महात्मा गांधी व स्व. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती निमित्य उपस्थित महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा, महाविद्यालयातील प्राध्यापक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी.




वाचन प्रेरणा दिवस निमित्य मार्गदर्शन करतांना कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा व वेगवेगळया ग्रंथाचे निरीक्षण करतांना महाविद्यालयातील प्राध्यापक तथा कर्मचारी वृन्द.

Scanned with CamScanner




संविधान दिवसाच्या कार्यक्रमात संविधानाच्या उद्देशपत्रिकेची शपथ घेतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम. शपथ ग्रहण करतांना — महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा, प्रा. डॉ. दिलीप सोनवाने, प्रा. डॉ. माधव वरभे व शिक्षकेत्तर कर्मचारी.




क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीबा फुले स्मृतिदिनानिमित्य आयोजित अभिवादन कार्यक्रमात उपस्थित महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा महाविद्यालयीन विद्यार्थी.

Scanned with CamScann



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्य आयोजित अभिवादन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित महा. कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम, डॉ. लेमदेव नागलवाडे, प्रा. लिलाधर बेदरे, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री मनोहर मुंगले व श्रीमती तरूताई मुन



माझी वसुंधरा कार्यक्रमात पर्यावरण रक्षणाची शपथ घेतांना प्रा. डॉ. रिजवान शेख. शपथ घेतांना — महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी.

Scanned with CamScanner



नगरपंचायत सिंदेवाही व्दारा आयोजित **माझी वसुंधरा** कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम. उपस्थित – नगरपंचायतच्या मुख्य कार्यपालन अधिकारी, नगराध्यक्षा, नगरपंचायतचे पदाधिकारी, श्री. गुरूदेव सेवामंडळचे कार्यकर्ते व गावकरी मंडळी.




**माझी वसुंधरा** कार्यक्रमाअंतर्गत पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्याकरिता नगरपंचायतव्दारे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत सहभागी झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी.

Scanned with CamScann




राजमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती प्रित्यर्थ त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा. योगेन्द्रजी जैस्वाल, महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ. सतिश चिंतावार, महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम व प्राध्यापक वृन्द.




मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या उपक्रमाच्या समारोपीय कार्यक्रमात मराठी भाषा संवर्धन विषयावर मार्गदर्शन करतांना मराठी विभाग प्रमुख प्रा. जनबंधू मेश्राम. मंचावर उपस्थित — रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, प्रा. टि. पी. बिसेन, प्रा. डॉ. वरभे, प्रा. डॉ. मेघराज देवासे, कार्य. प्राचार्य डॉ. वि. के. बत्रा व डॉ. राजेश डहारे.

Scanned with CamScann



भारतीय गणराज्य दिनाप्रित्यर्थ राष्ट्रध्वजाला मानवंदना देतांना संस्थेचे अध्यक्ष मा. योगेन्द्रजी जैस्वाल सोबतच संस्थेचे पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रिडाविभाग प्रमुख डॉ. लेमदेव नागलवाडे, प्राध्यापक वृन्द व निवडक रासेयो स्वयंसेवक.



गणराज्य दिनानिमित्य मार्गदर्शन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा. योगेन्द्रजी जैस्वाल, कार्यक्रमाला उपस्थित संस्था पदाधिकारी, सर्वोदय ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, तथा प्राध्यापक वर्ग.

Scanned with CamScann




महाविद्यालयात रासेयो विभाग व क्रिडा विभागाव्दारा आयोजित रक्तदान शिबीर प्रसंगी उपस्थित संस्था अध्यक्ष मा. योगेन्द्रजी जैस्वाल, सचिव मा. अरविंद जैस्वाल, कार्य. प्राचार्य डॉ. विजेन्द्र बत्रा, ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलसंगे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनबंधू मेश्राम व चंद्रपूर जिल्हा रूग्णालयाचे डॉक्टर. रक्तदान करतांना – प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे.



रक्तदान करतांना महाविद्यालयीन युवक. रक्त घेतांना – जिल्हा शासकिय रूग्णालयाचे डॉक्टर व त्यांचे सहकारी.

Scanned with CamScann

# वृत्तपत्रीय कात्रणे

Scanned with CamScann

विविध उपक्रमातून जनजागृती : शहरात दररोज होतेय स्वच्छता

# शहर स्वच्छतेसाठी नगर पंचायतचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

सिंदेवाही : स्वच्छ सर्वेक्षण अभियान व माझी वसुंधरा मोहिमेंतर्गत शहर स्वच्छतेसाठी सिंदेवाही नगर पंचायतने पुढाकार घेतला आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी नगर पंचायतच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. रविवारी नगर पंचायततर्फे शहरातील मुख्य मार्गाने जनजागृती रॅली काढण्यात आली. नगराध्यक्ष आशा गंडाटे यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखविली. रॅलीमध्ये नगर पंचायतचे पदाधिकारी, कर्मचारी, शहरातील युवक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

पर्यावरणाच्या रक्षणासाठी राज्यात माझी वसुंधरा मोहीम राबविण्यात येत आहे. ३ जानेवारीला सावित्रीबाई जयंतीचे औचित्य साधून सिंदेवाही नगर पंचायतर्फे या मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी मुख्याधिकारी सुप्रिया राठोड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात 'येत आहे. या मोहिमेची जनजागृती करण्यासाठी रविवारी जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यानंतर नगर पंचायतच्या प्रांगणात मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.



सायकल रॅलीमध्ये सहभागी मुख्याधिकारी डॉ. सुप्रिया राठोड, न.पं.चे पदाधिकारी.

अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष आशा गंडाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याधिकारी डॉ. सुप्रिया राठोड, उपाध्यक्ष स्वप्निल कावळे, गटनेता नरेंद्र भैसारे, माजी बांधकाम सभापती सुरेश पेंदाम, सभापती नंदा बोरकर, नगरसेवक भूपेश लाखे, युनूस शेख, प्रा.डॉ. रिजवान शेख, प्रा.डॉ. जनबंधू मेश्राम, प्रा.डॉ. नालावडे, गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष सांगुळे, विनय खोब्रागडे, प्राचार्य संगीता यादव, कावळे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक न.प. अधीक्षक पंकज आसेकर संचालन युनूस शेख तर आभार सुधाकर निकुरे यांनी मानले.

लोकमत 'हॅलो चंद्रपूर' दि. १२-०१-२०२१ पृ. २

नवराष्ट्र - 'चंद्रपूर पुरवणी' दि. २ मार्च २०२१

# सर्वोदय महाविद्यालयात मराठी भाषा दिन

वार्ताहर @सिंदेवाही

विद्या प्रसारक संस्थाद्वारे संचालित सर्वोदय महाविद्यालय सिंदेवाही येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकतर्फे कवी कुसुमाग्रज यांचा जयंतीनिमित्त मराठी भाषा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजेंद्र बतरा होते आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. जनबंधू मेश्राम होते.

प्रा. जनबंधू मेश्राम यांनी आपल्या मार्गदर्शनात कवी कुसुमाग्रज च्या साहित्यिक लेखनावर व जीवन प्रवासावर प्रकाश टाकला. नटसम्राट, कौन्तेय, वीज म्हणाली धरतीला या नाटकाचे प्रसंगाचे अनेक उदाहरण देऊन स्पष्टीकरण केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. विजेंद्र बतरा यांनी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले. साहित्य हा समाजाचा आरसा आहे, साहित्यिक लेखन हा आजच्या तरुणांना योग्य मार्गाचे अवलंबन करायला शिकवते असे प्रतिपादन केले. प्रास्तविक व संचालन डॉ. रिझवान शेख यांनी केले आभार प्रदर्शन डॉ. लेमदेव नागलवाडे यांनी केले.




Scanned with CamScann

# सर्वोदय महाविद्यालयात रक्तदान शिबिर

सिंदेवाही (वा.). विद्या प्रसारक संस्थेद्वारा संचालित सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाही येथे राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागाचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी योगेंद्र जैस्वाल होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज पवार, अरविंद जयस्वाल, सुदामराव खोब्रागडे, यांची उपस्थिती होती. रक्तदानाचा प्रारंभ रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.लेमदेव नागलवाडे व प्रा.लिलाधर बेदरे यांनी रक्तदान करून केला. या शिबिरात 35 रक्तदात्यांनी रक्तदान केले.

नवराष्ट्र, चंद्रपुर/गडचिरोली दि. २६ फेब्रु. २०२१

# सर्वोदय महाविद्यालय



सिंदेवाही. विद्या प्रसारक संस्थेद्वारा संचालित सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाही येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा स्मृतिदिन जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विजेंद्र बत्रा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जनार्दन मेश्राम, प्रा. डॉ. लेमदेव नागलवाडे, प्रा. डॉ. रिजवान शेख, प्रा. अमित उके, नॅक समन्वयक डॉ. राजेश डहारे, प्रा. सुमेधा बिसेन, डॉ. दिलीप सोनवाने, डॉ. चंद्रशेखर डोंगरे, डॉ. सिद्धार्थ मडावी, ग्रंथपाल डॉ. दामोदर राऊत, ज्येष्ठ लिपिक मधुकर जाल्लावार व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कोविड-19 च्या नियमाचे पालन करून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले.

दि. ११.03.2021
दै. नवराष्ट्र.

Scanned with CamScanner